आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता
२० मार्च २०२६ - शुक्रवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- खरीप हंगामासाठी खतांची उपलब्धता वाढवण्याच्या दृष्टीने बोली प्रक्रियेची सरकारकडून पूर्तता

- इराणचे दुबई आणि कुवैतच्या ऊर्जासाठ्यांवर हल्ले

- आसाममधे विधानसभा निवडणुकीसाठी मुख्यमंत्री हिमंत बिस्व सरमा यांचा उमेदवारी अर्ज दाखल / गौरव गोगोई काँग्रेसचे मुख्यमंत्रीपदाचे उमेदवार घोषित

- महाराष्ट्रात चवदार तळे सत्याग्रहाच्या ९९ व्या वर्धापन दिनानिमित्त डॉ बाबासाहेब आंबेडकरांना आदरांजली

**आणि**

- जम्मू काश्मीर, उत्तराखंड आणि हिमाचल प्रदेशात हिमवृष्टी आणि पावसाची संततधार

**<><><><><>**

पश्चिम आशियातल्या संघर्षाच्या पार्श्वभूमीवर सरकारने यंदाच्या खरीप हंगामासाठी खतांची उपलब्धता वाढवण्याच्या दृष्टीने सक्षमसाठी व्यवस्थापन समितीबरोबरची बोली प्रक्रिया पूर्ण केली आहे. त्यामुळे युरिया खताच्या उत्पादनासाठी अतिरिक्त नैसर्गिक वायूसाठा उपलब्ध झाला असून त्यामुळे देशांतर्गत युरिया उत्पादन वाढणार आहे. यापूर्वी देशात ५४ हजार ५०० मेट्रिक टन प्रतिदिन इतकं युरिया उत्पादन होत होतं, ते आता ७६ हजार मेट्रिक टन प्रतिदिन इतकं वाढेल असा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. सध्या देशात ६१ लाख १४ हजार मेट्रिक टन इतका साठा उपलब्ध असून उत्पादनात वाढ झाल्यास त्याचा फायदा यंदाच्या खरीप हंगामासाठी होणार आहे.

**<><><><><>**

इराणमधे नववर्षदिन नवरोजचा सण साजरा होत असताना इस्राएलने आज पुन्हा तेहरानवर हवाई हल्ले चढवले. इराणच्या गॅस साठ्यांवर हल्ला न करण्याचं इस्राएलने कालच कबूल केलं होतं.

दरम्यान इराणने  शेजारी देशांवर हल्ले वाढवले आहेत. दुबईमधे आज पहाटे ईद उल फित्रनिमित्त नमाज अदा केली जात असताना इराणने क्षेपणास्त्र डागली.कुवेतमधल्या तेलशुद्धिकरण कारखान्यावरही इराणने हल्ला केल्याचं वृत्त आहे. तर हिजबोल्ला आणि इराणशी संबंधित जाळं उद्धवस्त केल्याचा दावा संयुक्त अरब अमिरातींनी केला आहे. सौदी अरेबिया, कतर, कुवैत आणि युएई च्या उर्जासाठ्यांवर आणि लगतच्या जहाजांवर इराणने हल्ले केल्याचं या देशांनी म्हटलं आहे. संयुक्त राष्ट्रांच्या सुरक्षा परिषदेत काल एक तातडीची बैठक झाली. त्यावेळी इराणने हल्ले थांबवावे असं आवाहन आखाती देशांच्या प्रतिनिधींनी केलं.

**<><><><><>**

इराणविरुद्धच्या आपल्या लष्करी मोहिमेद्वारे इस्रायल आणि अमेरिका संपूर्ण जगाचे संरक्षण करत आहेत, असं इस्रायलचे प्रधानमंत्री बेंजामिन नेतान्याहू यांनी म्हटलं आहे. ते काल जेरुसलेममध्ये आयोजित पत्रकार परिषदेत बोलत  होते. इस्रायली हल्ल्यांमुळे इराणची लष्करी क्षमता लक्षणीयरीत्या कमी झाली असून नेतान्याहू यांनी दावा केला की, तेहरान आता युरेनियमचं संवर्धन करू शकत नाही किंवा बॅलिस्टिक क्षेपणास्त्रे तयार करू शकत नाही. महत्त्वाच्या जागतिक तेल मार्गात अडथळा आणून इराण जगाला वेठीस धरण्याचा प्रयत्न करत असल्याचा आरोप करत असे प्रयत्न यशस्वी होणार नाहीत, असं नेतान्याहू यांनी  सांगितलं.

दरम्यान, पेंटागॉन या अमेरिकेच्या संरक्षण विभागानं इराण युद्धासाठी अमेरिकन काँग्रेसकडे **२००** अब्ज अमेरिकन डॉलर्सच्या अतिरिक्त निधीची मागणी केली आहे.

**<><><><><>**

दहशतवादाला असलेला आपला पाठिंबा पाकिस्तान जोपर्यंत थांबवणार नाही, तोपर्यंत सिंधु पाणी करार स्थगित राहील, असा इशारा भारताने दिला आहे. दहशतवादाचं केंद्र बनलेल्या पाकिस्तानने सिंधु पाणी करारासंदर्भात बोलण्यापूर्वी आधी माणुसकी जपावी, असे खडेबोल संयुक्त राष्ट्रातले भारताचे स्थायी प्रतिनिधी पी हरीश यांनी सुनावले आहेत.

**<><><><><>**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी आज उत्तरप्रदेशात वृंदावन इथल्या रामकृष्ण सेवाश्रम रुग्णालयात कर्करोग उपचार केंद्राचं उद्घाटन केलं. आयुष्मान भारत योजनेअंतर्गत केंद्रसरकार देत असलेल्या सुविधांची माहिती त्यांनी यावेळी उपस्थितांना दिली. राष्ट्रपती कालपासून तीन दिवसांच्या उत्तरप्रदेश दौऱ्यावर आहेत. वृंदावन इथल्या प्रेमानंद जी महाराज आश्रम आणि नीम करोली बाबांच्या समाधीस्थळालाही त्यांनी आज सकाळी भेट दिली.

राष्ट्रपती आज संध्याकाळी वात्सल्य ग्राम या महिला, बालकं आणि वृद्धांसाठी कार्यरत संस्थेला भेट देणार आहेत.

**<><><><><>**

पुद्दुचेरीसह चार राज्यांच्या विधानसभा निवडणुका जाहीर झाल्यानंतर राजकीय घडामोडींना वेग आला आहे.

आसाममध्ये मुख्यमंत्री हिमंत बिस्वा सरमा यांनी आज मिरवणुकीने जाऊन उमेदवारी अर्ज दाखल केलं.

**आसाम मध्ये** काँग्रेस आणि रायजोर दल यांच्यात युती झाल्याची औपचारीक घोषणा काँग्रेसचे नेते गौरव गोगोई यांनी आज केली. गौरव गोगोई यांच्या नेतृत्वावर आपला पूर्ण विश्वास असल्याचं सांगंत ते मुख्यमंत्रीपदाचे उमेदवार असतील, असं अखिल गोगोई यांनी जाहीर केलं.

AIADMK, भाजप आणि एनडीएमधी इतर घटक पक्षांचा जागावाटपाचा अंतिम निर्णय लवकरच जाहीर केला जाईल, अशी माहिती AIADMKचे सरचिटणीस एडप्पाडी के. पलानीस्वामी यांनी आज दिली. पलानीस्वामी यांनी काल भाजपचे ज्येष्ठ नेते आणि गृहमंत्री अमित शहा यांची काल भेट घेतली.

काँग्रेसनं ३७ उमेदवारांची दुसरी यादी जाहीर केली. याआधी, काँग्रेसनं ५५ उमेदवारांची यादी जाहीर केली होती. केरळ, पुद्दुचेरी, आसाम इथं ९ एप्रिल ला विधानसभा निवडणुका होणार असून ४ मे रोजी मतमोजणी होईल.

**<><><><><>**

महाड इथलं ‘चवदार तळं’ सर्वांसाठी खुलं करण्यासाठी झालेल्या सत्याग्रहामुळे केवळ महाराष्ट्राचाच नाही तर देशाचा इतिहास बदलला. या सत्याग्रहाच्या माध्यमातून भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी देशात समतेची जाणीव रुजवली. त्यामुळे हे आंदोलन महत्त्वाचं मानलं जातं, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे. ते आज महाड इथं चवदार तळं जल शुद्धीकरण प्रकल्प आणि परिसर सुशोभीकरण प्रकल्पाच्या भूमिपूजन समारंभात बोलत होते. ते म्हणाले…

**होल्ड बाईट**

या कार्यक्रमाला केंद्रीय मंत्री रामदास आठवले, सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट, मंत्री भरत गोगावले, अदिती तटकरे उदय सामंत यावेळी हे मंत्रीगण उपस्थित होते.

**<><><><><>**

कुशल मनुष्यबळासाठी वाढती जागतिक स्पर्धा लक्षात घेता, अमेरिकेत उच्च शिक्षण घेतलेल्या परदेशी विद्यार्थ्यांसाठीच्या 'OPT', या कार्यक्रमाला पाठिंबा देण्याबाबतचं एक द्विपक्षीय विधेयक अमेरिकेच्या संसदेत नुकतंच मांडण्यात आलं. या विधेयकात इमिग्रेशन आणि राष्ट्रीयत्व कायद्यात सुधारणा करण्याचा प्रस्ताव

असून, त्या लागू झाल्यावर आंतरराष्ट्रीय विद्यार्थ्यांना अमेरिकेत पदवी संपादन केल्यावर आपल्या अभ्यास क्षेत्राशी संबंधित कामाचं प्रशिक्षण आणि रोजगाराची परवानगी औपचारिकपणे मिळवता येईल.

<><><><>

अमेरिकेत नोकरी मिळवण्यासाठी आवश्यक असलेल्या H-1B व्हिसा कार्यक्रमावर अमेरिकन संसदेत या आठवड्यात चर्चा झाली.

<><><><>

सीमाशुल्क विभागाच्या 'हवाई गुप्तचर पथकानं' मुंबईतल्या छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळावर गेल्या मंगळवारी केलेल्या कारवाईत सुमारे ६४ कोटी रुपये किमतीची गांजाची तस्करी उघडकीला आणली. या प्रकरणी ४ जणांना अटक झाली असून, त्यांना १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी देण्यात आली.

<><><><>

फ्रान्समध्ये सुरु असलेल्या ऑर्लिन्स मास्टर्स बॅडमिंटन स्पर्धेत,तन्वी शर्मा, इशाराणी बरुआ आणि मालविका बनसोड या भारतीय खेळाडूंनी 'पॅलेस डे स्पोर्ट्स' इथं महिला एकेरीच्या उपांत्यपूर्व फेरीत धडक मारली आहे. महिला उपउपान्त्यपूर्व फेरीत, तन्वीनं भारताच्याच अनमोल खरबचा पराभव केला; तर इशाराणी बरुआनं कॅनडाच्या वेन यू झांगचा पराभव केला. आणखी एका सामन्यात, मालविका बनसोडनं मलेशियाच्या वोंग लिंग चिंगला हरवलं. पुरुष दुहेरीत अर्जुन मदाथिल रामचंद्रन आणि हरिहरन अमसाकरुणाकरन या जोडीनंही उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला आहे.

<><><><>

आज जागतिक चिमणी दिन आहे. चिमण्यांच्या घटत असलेल्या संख्येबद्दल जागृती निर्माण करण्यासाठी २०१० सालापासून भारतातल्या नेचर फॉरेव्हर संस्था

आणि इकोसिस ॲक्शन  फौंडेशन यांच्या संयुक्त प्रयत्नांमधून हा दिन सुरु झाला होता.

**<><><><><>**

जम्मू काश्मीरमधे आज सलग पाचव्यादिवशी जोरदार हिमवृष्टी आणि पाऊस होत आहे. राज्यात सर्वत्र तापमान कमी झालं आहे. डोंगराळ भागात सतत हिमवृष्टी होत असून काल दिवसभरात गुलमर्गमधे २३ सेंटीमीटर जाड  बर्फाचा थर साचला होता. या महिनाअखेरीस पुन्हा एकदा मध्यम ते जोरदार हिमवृष्टीची शक्यता आहे. पर्यटकांनी हवामानाचा अंदाज घेऊन सहलीचे बेत आखावे असं प्रशासनानं सांगितलं आहे.

हिमाचल प्रदेशसाठी उत्तराखंडमधेही कालपासून डोंगराळ भागात हिमवृष्टी होत असून तराईमधे अधूनमधून पाऊस पडत आहे. चारधाम क्षेत्रात हिमवृष्टीमुळे कडाक्याची थंडी आहे.

महाराष्ट्रात, काल विविध जिल्ह्यांमध्ये पुन्हा एकदा अवकाळी पावसानं जोरदार हजेरी लावली. पश्चिम बंगाल आणि सिक्कीमच्या उपहिमालयीन क्षेत्रात आज अतिवृष्टीची शक्यता आहे.

**//<><><><><>//**